# सत्र काळातील कामकाजाचा आढावा

**अध्यक्ष** : हिवाळी अधिवेशनाचा आजचा शेवटचा दिवस आहे आणि आजचे दिवसाचे कामकाज सुध्दा आता संपले आहे. मी या सत्रकाळातील कामकाजाचा आढावा आता सदनासमोर ठेवतो.

विधानसभेचे सोमवार, दिनांक ११ डिसेंबर, २०१७ पासून नागपूर येथे सुरु झालेले हिवाळी अधिवेशन आज शुक्रवार, दिनांक २२ डिसेंबर, २०१७ रोजी संस्थगित होत आहे.

या सत्रकाळातील बैठकांची एकूण संख्या १० असून प्रत्यक्षात कामकाज ६९ तास ५७ मिनिटे झालेले आहे. मंत्री उपस्थित नसल्यामुळे १० मिनिटे व अन्य कारणामुळे ४ तास १६ मिनिटे असा कामकाज होऊ न शकलेला एकूण कालावधी ४ तास २६ मिनिटे आहे. सभागृहाचे रोजचे सरासरी कामकाज ७ तास ४६ मिनिटे झालेले आहे.

प्राप्त झालेल्या तारांकित प्रश्नांची एकूण संख्या ९२४५ असून स्वीकृत झालेल्या तारांकित प्रश्नांची एकूण संख्या ६७० आहे. सभागृहात एकूण ३६ प्रश्नांची तोंडी उत्तरे देण्यात आली. तसेच प्राप्त झालेल्या अल्पसूचना प्रश्नांची संख्या ३ असून स्वीकृत झालेल्या अल्पसूचना प्रश्नांची संख्या १ आहे.

प्राप्त झालेल्या लक्षवेधी सूचनांची एकूण संख्या २७६८ असून स्वीकृत लक्षवेधी सूचनांची संख्या १२९ आहे. तर चर्चा झालेल्या लक्षवेधी सूचनांची संख्या ३७ आहे.

**अध्यक्ष.....**

या अधिवेशनात विधानसभेने एकूण १९ विधेयके संमत केली व दोन्ही सभागृहांनी मिळून एकूण ११ विधेयके (विधानसभेची ११ व विधान परिषदेची ००) संमत केली.

अर्धा-तास चर्चेच्या एकूण ३२० सूचना प्राप्त झाल्या त्यापैकी १३० स्वीकृत करण्यात आल्या आणि सभागृहात ४ अर्धा-तास चर्चेच्या सूचनेवर चर्चा झाली.

नियम २९३ अन्वये २ प्रस्तावांवर चर्चा करण्यात आली.

अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा झाली.

संपूर्ण अधिवेशन कालावधीत सभागृहात माननीय सदस्यांची एकूण सरासरी उपस्थिती ७९.२६ टक्के होती. त्यात जास्तीत जास्त उपस्थिती ९१.५ टक्के तर कमीत कमी उपस्थिती ८८.३२ टक्के एवढी होती.

या अधिवेशनाचा समारोप करताना मी माननीय मुख्यमंत्री, माननीय संसदीय कार्यमंत्री, सर्व मंत्री महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते, सर्व माननीय तालिका सभाध्यक्ष, सर्व सन्माननीय गट नेते, सर्व सन्माननीय सदस्य, प्रसिध्दी माध्यमांचे प्रतिनिधी, विधिमंडळाचे अधिकारी व सर्व कर्मचारी, सर्व सुरक्षा अधिकारी व कर्मचारी या सर्वांचे मी मनापासून आभार मानतो. मंत्रालयीन अधिकारी व कर्मचा-यांचे देखील मी या ठिकाणी आवर्जून आभार मानतो.

----------